# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता.०९/०७/२०२०

## गंभीर दु:खापतीच्या गुन्हयातील आरोपीस अटक करुन
## दोन पिस्टल व चार जिवंत काडतुस जप्त
## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

दिनांक ०९/०७/२०२० रोजी गुन्हे शाखा युनिट २ कडून कोरोना संसर्गामुळे सुरु असलेल्या लॉकडाऊन अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई साहेब यांचे आदेशाने रेकॉर्डवरील गुन्हेगार चेकींगची व्यापक मोहीम राबविण्यात येत असुनपोलीस नाईक जयवंत राऊत यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, गंभीर दुःखापतीचागुन्हा दाखल असलेला पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार प्रज्ञेश नेटके हा महींद्रा कंपनीकडून तळवडेकडे येणारे रोडवर निघोजे गावचे हदीत महींद्रा कंपनी पार्किंग लगत घातक अग्निशस्त्रासह येणार असल्याची बातमी मिळालेने वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री उत्तम तांगडे यांना बातमीचा आशय कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली सदर ठिकाणी पोलीस उप निरीक्षक एस डी निलपत्रेवार, पोलीस हवालदार शिवानंद स्वामी, प्रमोद वेताळ, पोलीस नाईक जयवंत राऊत, पोलीस कॉंस्टेबल नामदेव राऊत, आतिष कुडके यांनी सापळा लावुन आरोपी प्रज्ञेश संजय नेटके वय २३ वर्षे, धंदा- मजुरी रा. मुळ वाठार येळुशी ता.कोरेगाव जि.सातारा सध्या फ्लॅट नंबर ३, पहीला मजला, जयवंत अपार्टमेंट,गावडे भोईर आळी, चिंचवडगावहा पळुन जाण्याच्या तयारीत असतांना त्यासशिताफीने अटक केली त्याची अंगझडती घेवून त्याचे जवळील सॅक बॅगची तपासणी केली असता त्यामध्ये दोन देशी बनावटीचे पिस्टल व चार जिवंत काडतुस मिळुन आले. आरोपी प्रज्ञेश संजय नेटके यास अटक करुन त्याचे विरुध्द म्हाळुंगे चौकी चाकण पोलीस ठाणेकडे भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. वरीष्ठांचे परवानगीने गुन्हे शाखा युनिट २ कडील पोलीस उप निरीक्षक एस डी निलपत्रेवार हे करीत आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर आर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे प्रभारी वरीष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, पोलीस उप निरीक्षक संयज निलपत्रेवार, पोलीस कर्मचारी संपत निकम, पोहवा. शिवानंद स्वामी, केराप्पा माने, प्रमोद वेताळ, दिपक खरात,वसंत खोमणे, मपोहवा उषा दळे, विपुल जाधव,चेतन मुंढे, जमीर तांबोळी,जयवंत राऊत, आतिष कुडके, नामदेव राऊत,यांचे पथकाने केली आहे.